# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४ / ६५ / ६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www. mercindia.org.in

जाहिरात क्र. ३९/२०१०–११

## जाहीर सूचना

**प्रकरण क्र. २०११ चा ३९** **२२ मार्च, २०११**

**आर्थिक वर्ष २०११–१२ करिता नूतनशील ऊर्जेच्या दराबाबत आयोगाने स्वत: तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सुनावणी**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम २०१० मधील विनियम ८ च्या संबंधात, महाराष्ट्रातील सर्व नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता आर्थिक वर्ष २०११–१२ साठी सामान्य वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने स्वतः पुढाकर घेऊन प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. आयोग सदर प्रारुप आदेशावर याद्वारे जनतेकडून हरकती व सूचना मागवित असून त्या कृपया सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५ (फॅक्स क्र. ०२२–२२१६३९७६; ई–मेल : mercindia@mercindia.org.in) यांना **१२ एप्रिल, २०११** पर्यंत पाठवाव्यात.

३. इच्छुक व्यक्तींनी आपल्या हरकती आणि सूचना इंग्रजी किंवा मराठीत ६ प्रतींमध्ये पाठवाव्यात आणि त्यावर पाठविणाऱ्याने आपले पूर्ण नाव, पोस्टाचा आणि, असल्यास, ई–मेलचा पत्ता कळवावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच अशा व्यक्तीला आपले म्हणणे आयोगासमोर व्यक्तीशः मांडावयाचे असल्यास ते देखील त्यात नमूद करण्यात यावे म्हणजे त्यास अशी संधी आयोगाद्वारे **७वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ येथे दिनांक १५ एप्रिल, २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता** घेण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी देण्यात येईल. या सुनावणीची वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

सही/–
(के. एन. खवारे)
सचिव, मविनिआ

**मुंबई,**
**दिनांक : २२ मार्च, २०११**

size12h cms X 8w cms (2 col.)